# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 06/02/2023 (सोमवार) सकाळ

---

## चोरी

**पो.स्टे. मौदा :–** अंतर्गत जनता हायस्कुल मौदा येथे दिनांक ०४/२/२०२३ चे २१.४५ वा. ते २०:०० वा. दरम्यान शाळेच्या वरचे मजल्यावर बांधकाम सुरु असुन सदर बांधकाम हे शहापुर येथील ठेकेदार यांना दिलेले आहे. यातील फिर्यादी नामे– सुखदेव दिवाळु उके, रा. रामनगर मौदा हे जनता हायस्कुल येथे चपराशी या पदावर कार्यरत असुन ते रात्री जेवन झाल्यावर शाळेकडे फिरायला गेले असता जनता हायस्कुल जवळुन आरोपी नामे– १) संजय ईखार, रा. मौदा ता. मौदा २) रविंद्र चिरकुट रा. मौदा ता. मौदा हे दोन ईसम डोक्यावर दोन तरापे घेवुन जातांना दिसले तेव्हा फिर्यादी यांनी त्यांना आवाज दिला असता ते तरापे खाली फेकुन ते पळु लागल्याने तेथील फिरणाऱ्या लोकांचे मदतीने त्यांना पकडुन शाळेतील तराफ्यांची पाहणी केली असता २० तराफे पैकी ०६ लोखंडी तरापे किंमती अंदाजे ६०००/– रूपयाचा मुद्देमाल चोरी करतांना मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपींविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपींना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार ब. नं. ४५ संजय देशमुख मो. नं. ९९२२४४७०४५ हे करीत आहे.

## दुखापत

**१) पो.स्टे. काटोल:–** अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील पंचवटी काटोल येथे दिनांक ५/२/२०२३ चे १८.३० वा. ते १८.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– रोशन उपासराव ढोणे, वय २८ वर्ष, रा. ढीवरवाडी ता. काटोल यास अंकित वरघट याने म्हटले की माझे वडिल सुधाकर वरघट हे आरोपी नामे– जसबीर सिंग रा. पंचवटी काटोल यांचे कडे दारू पित आहे. वडिलांना सोबत घरी घेवून जावू असे म्हटले असता, मित्रासह फिर्यादी आरोपीचे घरी गेले असता अंकित याने वडिलांना सोबत घेतले त्यामुळे जसबीर सिंग याने फिर्यादीस तु इथे कशाला आला तु मला मारायला आला का असे म्हणून झगडा भांडण केले व हातात लाकडी काठी घेवून फिर्यादीचे हातावर व पायावर व डोक्यावर मारून जखमी केले व खिशात असलेला मोबाईल काठीने फोडून नुकसान केले व शिवीगाळ करून तुम्ही जर पून्हा इथे आले तर तुम्हाला मारतो अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ४२७, ५०४, ५०६ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक प्रविण पवार ब. नं. ९१९ पोस्टे काटोल मो. नं. ९८२२७१६९१९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. वेलतूर :**— अंतर्गत १२ कि.मी. अंतरावरील मौजा राजोली पुर्नवसन येथे दिनांक ०४/०२/२०२३ चे २१.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— राजहंस मन्साराम शेंडे, वय ३८ वर्ष, रा. राजोली ता. कूही व आरोपी नामे— उत्तम गंगाधर देशपांडे, वय अंदाजे ४२ वर्ष, रा. राजोली पुर्नवसन, ता. कूही हे एकाच गावातील रहिवासी असून आजुबाजूला घरे लागुन आहे. यातील आरोपीचे त्याचे घरासमोरील भागात खाली प्लॉट आहे. फिर्यादीचा कुत्रा ओरडत असतांना नमूद घटना वेळी व ठिकाणी यातील आरोपी हा त्याच्या खाली प्लॉटवर येवून कुत्र्याला वाईट शब्दात बोलु लागला तेव्हा फिर्यादी हा तिथे आला व आरोपीस म्हणाला की ''तु कशाला शिव्या देतो'' या कारणावरून आरोपीने त्याच्या हातात असलेल्या दंडयाने फिर्यादी यांना मारण्यास सुरुवात केली तेव्हा फिर्यादीचे आई—वडिल तसेच पत्नी मध्यस्थी आले असता त्यांना सुद्धा धक्का देवून आई—वडिलांना मारहाण केली फिर्यादीस काठीने मारल्याने त्याचे डाव्या गालावर, उजव्या डोळयावर व बाजूला डाव्या कानावर मारुन जखमी करुन सर्वांना जिवाने मारण्याची धमकी देवून शिवीगाळ केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. वेलतूर येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला सुचनापत्रावर सोडण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील पोलीस हवालदार ब. नं. ६३६ मदन आसतकर, पो.स्टे. वेलतूर, मो. नं. ९०११८५१६३६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**